# बंगालमध्ये NIA च्या पथकावर हल्ला

## ५० शेकडो ग्रामस्थांच्या जमावाने कारला घातला घेराव, दगडफेक, एक अधिकारी जखमी

केंद्रीय तपास यंत्रणांच्या पथकावर पश्चिम बंगालमध्ये पुन्हा एकदा हल्ला झाला आहे. बंगालमधील पूर्व मिदनापूर जिल्ह्यात एनआयएचं एक पथक तपासासाठी आलं असताना जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. बंगालमध्ये छ्ख- च्या पथकावर हल्ला, शेकडो ग्रामस्थांच्या जमावाने कारला घातला घेराव, दगडफेक, एक अधिकारी जखमीकेंद्रीय तपास यंत्रणांच्या पथकावरपश्चिम बंगालमध्येपुन्हा एकदा हल्ला झाला आहे. बंगालमधील पूर्व मिदनापूर जिल्ह्यात एनआयएचं एक पथक तपासासाठी आलं असताना जमावाने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात एनआयएचा एक अधिकारी जखमी झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार आज सकाळी एनआयएचं पथक तृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या घरी २०२२ मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाप्रकरणी चौकशी करण्यासाठी आलं होतं.- ऊत्तएठढखडएचएछढतृणमूल काँग्रेसच्या नेत्याच्या घरी झालेल्या त्या बॉम्बस्फोटामध्ये३ जणांचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एनआयएने २०२२ च्या डिसेंबर महिन्यामध्ये चौकशीसाठी बलाई मैती आणि मोनोब्रत जाना यांच्यासह टीएमसीच्या काही स्थानिक नेत्यांना समन्स बजावले होते. तसेच आज सकाळी एनआयएच्या पथकाने तिथे पोहोचून संशयितांना ताब्यात घेतले होते. एनआयएचं पथक संशयितांना घेऊन माघारी परतत असताना ग्रामस्थांच्या जमावाने त्यांचे वाहन अडवले. तसेच त्यांना सोडण्याची मागणी केली. मात्र एनआयएच्या पथकाने त्यास नकार देताच जमाव संतप्त झाला. तसेच या जमावाने एनआयएच्या पथखाच्या वाहनावर हल्ला





केला. यात कारच्या काचा फुटून एनआयएचे दोन अधिकारी जखमी झाले. मात्र एनआयएचे पथक जमावाच्या तावडीतून सुटून पोलीस ठाण्यात पोहोचण्यामध्ये यशस्वी झाले. ३ डिसेंबर २०२२ रोजी पूर्व मिदनापूरमधील भूपतीनगर येथे घरात झालेल्या स्फोटात हे घर जमीनदोस्त झाले होते. तसेच स्फोटामध्ये ३ जणांचा मृत्यूही झाला होता. या स्फोटाप्रकरणी तपास करण्यासाठी मागच्या महिन्यात एनआयएने तृणमूल काँग्रेसच्या ३ नेत्यांना समन्स बजावले होते.

# मतदानासाठी बोटांना किती लागणार शाई?


**बंगळुरू :** मतदान केल्यानंतर मतदारांच्या बोटाला विशिष्ठ प्रकारची शाई लावण्यात येते. ही शाई काही दिवसांपर्यंत टिकून राहते. म्हैसूर पेंट्स ंड वॉर्निश लिमिटेडने यंदाच्या लोकसभा निवडणुकीसाठी शाईचा पूरवठा पूर्ण केला आहे. शाईची सर्वात मोठी खेप उतर प्रदेशला पाठविण्यात आली आहे. कर्नाक सरकारची ही कंपनी असून १९६२ पासून निवडणुकीसाठी लागणाऱ्या विशेष शाईचे उत्पादन करीत आहे.

**एवढी शाई पुरविली**

_ २६.५५ लाखांपेक्षा जास्त बाटल्या.

- ५५ कोटी रुपये एकूण किंमत.

- ३.५८ लाख सर्वाधिक




बाटल्या उत्तर प्रदेशला.

- ११० सर्वात कमी बाटल्या लक्षद्वीपला.
- २.६८ लाख महाराष्ट्र
- १.९३ लाख बिहार
- २.०० लाख प. बंगाल
- १.७५ लाख तामिळनाडू
- १.५२ लाख मध्य प्रदेश
- १.५० लाख तेलंगणा
- १.३२ लाख कर्नाटक

# शशी थरुर यांची संपत्ती २० कोटींनी वाढली

**तिरुवनंतपुरम :** काँग्रेसचे नेते व केरळच्या तिरुवनंतपुरम या मतदारसंघातील विद्यमान खासदार शशी थरूर यांच्याकडे ५५ कोटी रुपयांची संपत्ती आहे. उमेदवारी अर्ज भरताना दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात त्यांनी ही माहिती दिली आहे. त्यांच्याकडे मारुती सिएझ, मारूती एक्सएल ६ अशा दोन कार आहेत. थरुर तिरुवनंतपुरममधून सलग तीनदा निवडून आले आहेत.

**कोटी रुपये**

२०२४--------५५ कोटी रुपये

- १९ बँक खात्यांमध्ये असलेल्या ठेवी तसेच रोखे, डिबेंचर, म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक केलेली असून बहरीन आणि अमेरिकेतील बँकांमध्ये त्यांची खाती आहेत.
- ४.३२ कोटी रुपये २०२२-२०२३ या वर्षात उत्पन्न होते.
- ४९ कोटी रुपयांपेक्षा अधिक जंगम मालमत्ता आहे.
- ५३४ ग्रॅम सोने.
- ३६ हजार रुपये रोख.
- ६.७५ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीची स्थावर मालमत्ता.
- १०.४७ एकर शेतजमीन. किंमत ६.२० कोटी रुपये.
- ५२ लाख रुपये किमतीचे तिरुवअनंतपुरम येथे निवासस्थान.
- १६.४९ लाख रुपयांचे कर्ज.

देशभरात नऊ एफआयआर दाखल

काँग्रेस नेते शशी थरूर यांच्यावर देशभरात विविध



प्रकरणांत नऊ एफआयआर दाखल आहेत. त्यातील बहुतांश एफआयआर हे विविध गटांत शत्रुत्व निर्माण होण्यास कारणीभूत ठरल्याबद्दल नोंदविण्यात आले होते.

# बर्ड फ्लू H5N1 हा कोरोनापेक्षा १०० पट जास्त प्राणघातक

बर्ड फ्लू H5N1 च्या संभाव्य धोक्याबद्दल डॉक्टर आणि आरोग्य तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. आरोग्य तज्ञ म्हणतात की, हा नवीन आजार कोरोना महामारीपेक्षा १०० पट जास्त धोकादायक ठरू शकतो. या फ्लूमुळे निम्म्याहून अधिक लोकांचा मृत्यू होण्याचीही दाट शक्यता आहे. त्यांनी भीती व्यक्त केली आहे की, व्हायरसच्या संसर्गाची पातळी तीव्र होऊ शकते ज्यामुळे जागतिक महामारीचा जन्म होऊ शकतो.

पिट्सबर्गमधील प्रमुख बर्ड फ्लू संशोधक डॉ. सुरेश कुचिपुडी यांनी इशारा दिला आहे की H5N1 मध्ये साथीचा रोग निर्माण होण्याची क्षमता आहे. याचे कारण असे की त्यात मानवांना तसेच अनेक सस्तन प्राण्यांना संक्रमित करण्याची क्षमता आहे.

फार्मास्युटिकल उद्योग सल्लागार आणि कॅनडा-आधारित फार्मास्युटिकल कंपनी बायोनियाग्राचे संस्थापक जॉन फुल्टन यांनी देखील हीच चिंता व्यक्त केली आहे. क्५छ१ ने महामारीचे रूप धारण केलं तर ते खूप गंभीर असेल असंही त्यांनी म्हटलं आहे. हा कोरोनापेक्षा जास्त प्राणघातक असू शकतो.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) नुसार, २००३ पासून H5N1 बर्ड फ्लूची लागण झालेल्या प्रत्येक १०० रुग्णांपैकी ५२ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. आत्तापर्यंत ८८७ प्रकरणे नोंदवली गेली आहेत, त्यापैकी एकूण ४६२ मृत्यू झाले आहेत. त्याच वेळी, कोविड-१९ ची लागण झालेल्या रुग्णांचा मृत्यू दर ०.१ टक्क्यांपेक्षा कमी आहे. तथापि, साथीच्या रोगाच्या सुरूवातीस ते सुमारे २० टक्के होते.

# तुमच्या घरात घुसून मारू!' राजनाथ सिंह यांचा इशारा; आता पाकिस्तानने दिले उत्तर



मोदी सरकारची दहशतवादाविरोधात झिरो टॉलरन्स पॉलिसी आहे. गेल्या दहा वर्षात सरकारने शेकडो दहशतवाद्यांना कंठस्नान घातले आहे. अशातच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दहशतवाद आणि पाकिस्तानबाबत मोठे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे पाकिस्तानला इतकी मिरची लागली की, पाकने संरक्षण मंत्र्यांच्या वक्तव्याचा निषेध केला.

एका मुलाखतीत राजनाथ सिंह यांना विचारण्यात आले होते की, भारतीय गुप्तचर संस्थांनी २०१९ नंतर पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचा दावा केला होता. तसेच,भारतानेआपले ध्येय साध्य करण्यासाठी पाकिस्तानच्या स्थानिक गुन्हेगारांची मदत घेतल्याचेही म्हटले. यावर तुम्ही काय सांगाल? या प्रश्नाला उत्तर देताना राजनाथ सिंह यांनी पाकिस्तानात घुसून दहशतवाद्यांना ठार मारल्याचे म्हटले.

संरक्षणमंत्र्यांच्या वक्तव्याने नाराज झालेल्या पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयाने एक निवेदन जारी करुन भारतावर अनेक आरोप केले. निवेदनात म्हटले की, भारतीय संरक्षणमंत्र्यांनी दिलेल्या वक्तव्याचा पाकिस्तान निषेध करतो. पाक सरकारने पाकिस्तानमध्ये होत असलेल्या हत्यांसाठी भारताला जबाबदार धरले आणि त्याचे पुरावेही दिले. पाकिस्तानात घुसून लोकांना म्हटले जाते आणि ठार केले जाते, हा भारताच्या अपराधाचा पुरावा आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारताला या कृतींसाठी जबाबदार धरावे, असे पाकिस्तानच्या निवेदनात म्हटले आहे.काय म्हणाले संरक्षण मंत्री राजनाथ सिंह?

पाकिस्तानमध्ये होत असलेल्या हत्याकांडावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संरक्षण मंत्री म्हणाले होते की, आपल्या शेजारी देशातील कोणत्याही दहशतवाद्याने आपल्या भारताची शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला किंवा भारतात दहशतवादी कारवाया केल्या, तर त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. तो पाकिस्तानात पळून गेला, तरीदेखील आम्ही पाकिस्तानात घुसून त्याला ठार करू. सीमेपलीकडील दहशतवादाविरोधात कठोर कारवाई करण्याची ताकद भारताकडे आहे, असे संरक्षणमंत्र्यांनी म्हटले होते.

### या राज्यांत मतदानात नारीशक्ती आघाडीवर

**दिल्ली :** देशातील एकूण मतदारांमध्ये महिलांचे प्रमाण निम्म्यापेक्षा थोडे कमी आहे. मात्र,मतदानकरताना महिला आघाडीवर असतात. काही राज्यांमध्ये तर त्यांनी पुरुषांना बरेच मागे टाकले आहे.

अनेक जबाबदाऱ्या सांभाळणारी नारी शक्तीमतदानाचेकर्तव्य पार पाडण्यातही अग्रेसर असल्याचे दिसून आले आहे.

महत्त्वाचे म्हणजे, मोठ्या आणि अर्थव्यवस्थेत आघाडीवर असलेल्या राज्यांच्या तुलनेत लहान राज्यांमधील महिला कर्तव्यदक्ष आहेत. २०१९च्या लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या आकडेवारीतून ही बाब अधोरेखित होते.

# लोकसभा निवडणुकीत चीन हेरा-फेरी करण्याच्या प्रयत्नात




आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे बनविलेला कंटेंटचा वापर करून चीन अमेरिका, दक्षिण कोरिया आणि भारतात होत असलेल्या निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करेल असा इशारा मायक्रोसॉफ्टने दिला आहे. मायक्रोसॉफ्टचा गंभीर इशारा! लोकसभा निवडणुकीत चीन हेरा-फेरी करण्याच्या प्रयत्नातकॉम्प्युटरमुळे घराघरात पोहोचलेल्या मायक्रोसॉफ्टने भारतातील लोकसभा निवडणुकीवरून गंभीर इशारा दिला आहे. निवडणुकीचचीनहेरा-फेरी करण्याच्या प्रयत्नात असल्याचे व तैवानमध्ये याची ट्रायलही झाल्याचे सांगत सावध केले आहे.आर्टिफिशिअल इंटेलिजन्सद्वारे बनविलेला कंटेंटचा वापर करूनचीनअमेरिका, दक्षिण कोरिया आणि भारतात होत असलेल्या निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करेल असा इशारा मायक्रोसॉफ्टने दिला आहे. मायक्रोसॉफ्टने शुक्रवारी थ्रेट इंटेलिजन्स रिपोर्ट जाहीर केला. यामध्ये उत्तर कोरियासोबत मिळून चीन हे कृत्य करत असल्याचे म्हटले आहे. चीनचे समर्थन असलेले काही सायबर ग्रुपचा यामध्ये हात असून निवडणुका प्रभावित करण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि एआय जनरेटेड कंटेंटचा वापर केला जाणार असल्याचे यात म्हटले आहे.अशा प्रकारे सोशल मीडियामध्ये कंटेंट पसरवून चीनचा हा प्रयोग येत्या काळात अत्यंत घातक ठरू शकतो, असे मायक्रोसॉफ्टने म्हटले आहे. जानेवारीमध्ये झालेल्या तैवानच्या राष्ट्रपती निवडणुकीत देखील चीनने हा प्रयोग केला होता. हे अशा प्रकारचे पहिलेच उदाहरण आहे. चीनचा एक सायबर ग्रुप जो स्टॉर्म १३७६ या नावाने ओळखला जातो त्याने तैवानच्या निवडणुकीत धुमाकूळ घातला होता. त्याला बिजिंगचा पाठिंबा होता. काही उमेदवारांना बदनाम करण्यासाठी एआय कंटेंट मोठ्या प्रमाणावर टाकला जात होता. देशात सध्या लोकसभा निवडणुका आहेत. या सात टप्प्यांमध्ये होणार आहेत. यामध्ये चीन सर्व पक्षांच्या चांगल्या उमेदवारांविरोधात सायबर मोहिम उघडण्याची शक्यता आहे. मायक्रोसॉफ्टच्या इशाऱ्यानंतर निवडणूक आयोगाला आता जास्त सतर्क राहण्याची गरज असल्याचे तज्ञांनी म्हटले आहे.

# पत्नीच्या खासदारकीला बाहुबलींचे 'बळ'

## नितीशकुमार व लालू यादवांनी दिली उमेदवारी

पाटणा - दोन वर्षांपेक्षा जास्त काळ तुरुंगात असलेल्या दोषींना सुटकेनंतर सहा वर्षांपर्यंत निवडणूक लढविता येत नाही. बिहारच्या राजकारणाची सुत्रे हलविणाऱ्या या बाहुबलींनी आता आपआपल्या पत्नींना निवडणुकीच्या रिंगणात उभे केले आहे. अशा बाहुबलींना सोबत ठेवण्यासाइी जडीयुचे नितीश कुमार व आरजेडीचे लालुप्रसाद यादव यांच्या पक्षांनी पायघड्या टाकल्या आहेत हे विशेष.

**पप्पू यादवांची बंडखोरी**

पूर्णीयाच्या जागवेर काँग्रेसचे राजेश रंजन उर्फ पप्पू यादव यांना उमेदवारी हवी होती जागा वाटपात हा मतदारसंघ राजदला गेला असून तेथे राजदच्या बिमा भारती यांना उमेदवारी दिली आहे. 'जान देंगे लेकीन पूर्णीया नही देंगे' अशी घोषणा करणारे यादव यांनी गुरूवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. कटीहारमध्ये घरचा आहेर

दूसरीकडे कटिहार मतदारसंघ कॉग्रेसला मिळाला असून तेथे काँग्रेसने तारिक अन्वर यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघात राजदचे राज्यसभा सदस्य अहमद अशफाक करीम यांनीही बंडाचे निशाण फडकवून राजद ला घरचा आहेर दिला आहे.- अशोक महतो हे बिहारमधील कुख्यात नाव. काँग्रेसच्या खासदार राजो सिंग यांचा मृत्यू झालेल्या शेखपुरा व जेलब्रेक अशा हत्याकांडात दोषी. ६२ वर्षाच्या अशोक महतो यांनी ४६ वर्षाच्या अनिता यांच्याशी लग्न केले व त्याच दिवशी राजदने मुंगेर मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली

अवधेश मंडल कोसी व पूर्णीयामधील मोठा गुन्हेगार, खुन, अपहरण यासारख्या गंभीर गुन्ह्यात खटले दाखल आहेत. विशेष म्हणजे पत्नी बीमा भारती यांनीही त्याच्याविरुद्ध मारहाणीची तक्रार केली होती. त्याच बिमा भारती आता राजदच्या तिकिटावर पूर्णियातून निवडणूक लढवणार आहेत.

आनंद मोहनला गोपालगंजचे जिल्हा दंडाधिकारी जी कृष्णय्या यांनी लिंचिंग प्रकरणी दोषी ठरवून १६ वर्षांची शिक्षा सुनावली होती. त्यांची पत्नी लवली



आनंद शिवहर मतदारसंघातून जेडीयु च्या तिकिटावर निवडणूक लढवत आहेत. त्यांना औरंगाबाद येथून निवडणूक लढवायची होती.-जेडीयूचे आमदार रमेश कुशवाह यांनी २०१६ मध्ये एका हत्येप्रकरणात स्थानिक न्यायालयात आत्मसमर्पण केले होते. याप्रकरणी त्याच्याविरुद्ध खटला अद्याप प्रलंबित आहे. तरीही त्यांनी आपली पत्नी विजयलक्ष्मी देवी यांच्यासाठी सिवानमधून उमेदवारी मिळविली आहे.

# अरविंद केजरीवालांची न्यायालयाकडे विशेष मागणी




## ED चा विरोध, न्यायालयात नेमकं काय घडलं?

आम आदमी पक्षाचे नेते तथा दिल्लीचे मुख्यमंत्रीअरविंद केजरीवालसध्या तिहार कारागृहात बंद आहे. आता त्यांनी आपल्या वकिलांसोबत भेटीची संख्या वाढवण्यासंदर्भात दिल्लीन्यायालयातयाचिका दाखल केली आहे. यात, कायदेशीर बैठकांची संख्या वाढवण्याच्या सूचना देण्यासंदर्भात आणि आठवड्यातून २ ऐवजी ५ वेळा भेटण्याची परवानगी देण्यासंदर्भात मागणी करण्यात आली आहे. यावर शुक्रवारी सुनवणी झाली.- ऊत्तएठढखडएचएछढ-वी लूयावेळी ईडीने केजरीवाल यांच्या या मागणीला विरोध केला. केजरीवाल यांची कारागृहातूनच सरकार चालविण्याची इच्छा आहे. यामुळे त्यांना कारागृहात स्पेशल ट्रीटमेंट दिली जाऊ शकत नाही. तसेच, केजरीवाल यांना विशेष अधिकार दिल्यास, त्याचा चुकीचा वापरही होऊ शकतो, ते आपल्या वकिलांच्या माध्यमाने आदेशही जारी करू शकतात, असे ईडीने म्हटले आहे.ईडीचे वकील जोहेब हुसैन म्हणाले, केवळ एखाद्या वक्तीने कारागृहातून सरकार चालवण्याचा पर्याय निवडला, म्हणून त्याला आपवाद मानले जाऊ शकत नाही, त्याला विशेषाधिकार दिला जाऊ शकत नाही. कायदेशीर बैठकांचा वापर सल्लामसलतीशिवाय इतर गोष्टींसाठीही केला जाऊ शकतो. तसेच, वकिलांच्या माध्यमाने आदेश काढले जात असल्याची निवेदनेही आहेत. तथापी, पाच कायदेशीर बैठकांची परवानगी देणे कारागृह नियमावलीच्या विरोधात आहे.

**केजरीवालांचे वकील काय म्हणाले?**

केजरीवाल यांची बाजू मांडणारे वकील विवेक जैन म्हणाले, आपल्या अशिलाविरुद्ध ३५ ते ४० वेगवेगळी प्रकरणे प्रलंबित आहेत. यामुळे आठवड्यातून केवळ दोन वेळा अर्ध्या तासाच्या बैठका प्रलंबित प्रकरणांची गुंतागुंत समजून घेण्यासाठी आणि सूचना देण्यासाठी पुरेशा नाहीत. याच प्रकरणामध्येन्यायालयीनकोठडीत असताना आपचे खासदार संजय सिंह यांनाही आठवड्यातून तीन वेळा त्यांच्या वकिलाला भेटण्याची परवानगी देण्यात आली होती, असा दावाही जैन यांनी यावेळी केला. याशिवाय, बैठकांच्या गैरवापरासंदर्भात ईडीची शंका चुकीची असल्याचेही जैन यांनी म्हटले आहे.यासंदर्भात न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. कथित अबकारी धोरण घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात १ एप्रिल रोजी न्यायालयाने केजरीवाल यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.